सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...

### १२ मार्च रोजी फॅन्सी ड्रेस स्पर्धा


**सोलापूर, दि. ६ मार्च-**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूरच्यावतीने येत्या १२ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता शिंदे चौकातील शिवस्मारक सभागृहात महिलांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संयोजिका डॉ. शिल्पा फडकुले यांनी पत्रकार परिषदेत दिली. या स्पर्धा वय वर्षे १८ आणि त्यापुढील महिलांसाठी खुली असून प्रत्येकास १०० रुपये प्रवेश फी क्यूआर कोडद्वारे ११ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत भरता येईल. स्पर्धक भारतीय संस्कृतीस अनुसरून विविध वेशभूषा धारण करून आपली प्रतिभा सादर करतील. प्रत्येक सादरीकरणासाठी १ मिनिटाची वेळ दिली जाईल. स्पर्धकांचा मूल्यांकन वेशभूषा, प्रस्तुतीकरण आणि आत्मविश्वास यांच्या आधारावर केला जाईल. सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र दिले जाईल. उत्कृष्ट पहिल्या ३ स्पर्धकांना पैठणी भेट देण्यात येईल, तर २ स्पर्धकांना उत्तेजनार्थ आकर्षक भेट वस्तू देण्यात येतील. अधिक माहिती, नावनोंदणी व क्यूआर कोडसाठी ७७७४०८७००० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही डॉ.फडकुले यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस डॉ. राजेश फडकुले, शोभना सागर, मंजिरी सवळे, लक्ष्मी आरगी, राधिका बिल्लमपल्ली उपस्थित होते.

### मध्यपूर्वेत अडकलेल्या सोलापूरकरांसाठी 'सहाय्यता गल्फ' लिंकची निर्मिती

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

मध्यपूर्व देशांमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांचे अचूक स्थान व आवश्यक माहिती मिळविण्यासाठी राज्य शासनाच्या राज्य आपत्कालीन कार्यकेंद्राकडून 'नवीन सहाय्यता गल्फ' ही विशेष लिंक जारी करण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील जे नागरिक सध्या आखाती देशांमध्ये अडकून पडले आहेत, त्यांनी तातडीने या लिंकवर जाऊन आपली माहिती भरावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. या माध्यमातून शासनाला अडकलेल्या नागरिकांचे ठिकाण समजून घेणे व त्यांना आवश्यक ती मदत पोहोचविणे सुलभ होणार आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, आखाती देशांमध्ये अडकलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांनीही ही लिंक संबंधित व्यक्तींना पाठवावी व त्यांना माहिती भरण्यास सांगावे. यामुळे शासनाला अडकलेल्या नागरिकांचा ठावठिकाणा मिळेल व मदतकार्य अधिक वेगाने करता येईल. या संदर्भात काही शंका अथवा अधिक माहिती हवी असल्यास नागरिकांनी जिल्हा आपत्कालीन कार्य केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे संपर्क साधावा. यासाठी (०२१७) २७३१०१२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. ती लिंक:https://geospatial.mahaseoc.in/Sahayatagulf/ अशी आहे.




### प्रिसिजन वाचन अभियानात अंबरीश मिश्र यांच्याशी साहित्यसंवाद

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

प्रिसिजन वाचन अभियानाच्या वतीने मराठी साहित्यातील मान्यवर लेखक, कवी आणि पत्रकार अंबरीश मिश्र यांच्या साहित्यावर आधारित विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आज, दिनांक ७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६.२५ वाजता हा कार्यक्रम सोलापूर येथील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे होणार आहे. या कार्यक्रमात अंबरीश मिश्र यांच्या साहित्यतील निवडक भागांचे अभिवाचन तसेच त्यांची मुलाखत असा कार्यक्रम होणार आहे.प्रख्यात लेखक, कवी आणि पत्रकार असलेल्या अंबरीश मिश्र यांच्या अनेक पुस्तकांनी वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. शुभ्र काही जीवघेणे, चौकात उधळले मोती, सुंदर ती दुसरी दुनिया, गंगेमध्ये गगन वितळले आणि दरवळे इथे सुवास अशा ललित लेखसंग्रहांमधून त्यांनी वाचकांना समृद्ध अनुभव दिला आहे. त्यांनी गुलजार यांच्या उर्दू कथांचा तसेच मिर्झा गालिब यांच्या चरित्राचा मराठी अनुवादही केला आहे. या कार्यक्रमात अभिवाचन आणि मुलाखतीत प्रसाद फणसे सहभागी होणार आहेत. प्रसाद फणसे हे गेली २५ हून अधिक वर्षे डबिंग क्षेत्रातील आघाडीचे नाव मानले जाते. त्यांनी पाच हजारांहून अधिक जाहिराती आणि पाचशेहून अधिक चित्रपटांसाठी डबिंग केले आहे. रामभाऊ माटे यांच्या मी नथुराम गोडसे बोलतोय या नाटकात त्यांनी महात्मा गांधींची भूमिका साकारली आहे. तसेच विजय तेंडुलकर यांच्या सरी गं सरी, सोलोदय आणि हुतूतू या नाटकांतही त्यांनी काम केले आहे.





# महापालिका स्थायी समितीच्या सभापतीपदी भाजपाच्या रंजिता चाकोते बिनविरोध

### १८ मिनिटांच्या निवड प्रक्रियेनंतर पिठासीन अधिकाऱ्यांनी केली घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मार्च-**

सोलापूर महापालिका स्थायी समितीच्या सभापतीपदी भाजपाच्या रंजिता चाकोते यांची बिनविरोध निवड करण्यात आली. दरम्यान, महापालिका आवारात क्रेनच्या सहाय्याने भव्य हार घालून, चार जेसीबीद्वारे पुष्पवृष्टी करत पर्यावरणपुरक जल्लोष साजरा करण्यात आला.

पिठासीन अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दि.६ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात आयोजित केलेल्या सभेत ही निवड करण्यात आली. प्रारंभी नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांनी निवड प्रक्रियेची माहिती दिली. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची उपस्थिती होती. भाजपाच्या रंजिता चाकोते यांचे दोन अर्ज प्राप्त झाले होते. छाननीअंती दोन्ही अर्ज वैध असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

पिठासीन अधिकारी निऱ्हाळी यांनी नियमाप्रमाणे अर्ज मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा वेळ दिला. १८ मिनिटाच्या निवड प्रकियेनंतर रंजिता चाकोते यांचा एकच अर्ज प्राप्त झाल्याचे सांगत त्यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली.

महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेविका तथा भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, महापालिका




आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे आदींनी स्थायी समितीच्या नूतन सभापती रंजिता चाकोते यांचा सत्कार केला. महापालिका आवारात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

#### चार जेसीबीद्वारे पुष्पवृष्टी

सोलापूर महापालिका आवारात चार जेसीबीद्वारे नूतन सभापती रंजिता चाकोते यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. क्रेनच्या साह्याने भला मोठा हार हार घालून पर्यावरणपूरक जल्लोष साजरा करण्यात आला. दरम्यान, नूतन सभापती चाकोते यांनी महापालिका आवारातील तसेच शहरातील विविध महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

#### हे आहेत स्थायी समितीचे १६ सदस्य

भाजपाचे १४, एमआयएम आणि शिवसेना शिंदे गटाचा प्रत्येकी एक असे स्थायी समितीमध्ये पक्षीय बलाबल आहे. यात भाजपाचे रंजिता चाकोते यांच्यासह अविनाश पाटील, सतीश सिरसिल्ला, गणेश वानकर, भारतसिंग बडूरवाले, सत्यनारायण गुर्रम, अश्विनी चव्हाण, संगीता जाधव, जयकुमार माने, शिवाजी वाघमोडे, कल्पना कदम, राजू पाटील, अमर पुदाले, बिज्जू प्रधाने. एमआयएमचे अझहर हुंडेकरी तर शिवसेनेचे अमोल शिंदे यांचा समावेश आहे.

#### पक्षश्रेष्ठींचा विश्वास सार्थ ठरविणार : चाकोते

भाजपा पक्षश्रेष्ठीने माझ्यावर विश्वास दाखवून मोठी जबाबदारी सोपवली आहे. तो विश्वास मी चागली कामे करून सार्थ ठरविणार आहे. सभापती पदाची जबाबदारी पार पाडत असताना विकासकामे प्रामुख्याने व्हावी. निधी आणि आर्थिक नियोजन केले जाईल. आर्थिक आखणी करताना खर्चावर नियंत्रण असावे. जनतेची अपेक्षापूर्ती करण्याचा प्रयत्न राहील, अशी भावना सभापती रंजीता चाकोते यांनी व्यक्त केली.

#### स्थायी समिती सभागृहासह कौन्सिल हॉलमध्ये फुलांची सजावट

स्थायी समिती सभापतीच्या निवडी निमित्ताने कौन्सिल हॉलमधील प्रवेशद्वार, स्थायी समिती सभागृह या परिसरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. हा संपूर्ण परिसर सजविण्यात आला होता. यामुळे सुंदर आणि प्रसन्न वातावरण निर्माण झाले होते.

#### चाकोते यांच्या कुटुंबीयांची आवर्जून उपस्थिती

स्थायी समिती सभापतीपदी निवडी दरम्यान पालिकेत रंजिता चाकोते यांच्या कुटुंबीयांची आवर्जून उपस्थिती होती. यात पती सकलेश चाकोते, सासू पुष्पा चाकोते, सासरे मदन चाकोते, चिरंजीव अंशुल चाकोते, स्वप्निल चाकोते, डॉ. किरण चाकोते, हरीश करजगीकर, शिल्पा करजगीकर, शोभा चाकोते, कियान चाकोते यांच्यासह अक्कनबळग महिला मंडळाच्या पदाधिकारी व महिला उपस्थित होत्या.

### महिलांसाठी ई-बसेस राखीव, पिंक टॉयलेट उपलब्ध करणार : चाकोते

**सोलापूर, दि.६ मार्च-**

श्री सिद्धरामेश्वरांच्या आशीर्वादाने आणि भाजपा पक्षश्रेष्ठींनी माझ्यावर विश्वास दाखवला. मला ही जबाबदारी दिली. ती प्रामाणिकपणे आणि निष्ठेने पार पाडणार आहे. महिलांसाठी ई-बसेस राखीव ठेवले जाणार आहेत. पिंक टॉयलेट उपलब्ध करण्यात येणार आहेत. प्रत्येक विभागासाठी समान निधी देण्याचा विचार आहे, अशी ग्वाही स्थायी समितीच्या नूतन सभापती रंजिता चाकोते यांनी दिली. सोलापूर महापालिकेच्या स्थायी समितीच्या सभापतीपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्या पुढे म्हणाल्या, धुळ मुक्त, स्वच्छ, हरित आणि पर्यावरण युक्त सोलापूर शहर करण्याचा प्रयत्न राहील. एक व्हिजन ठेवून नवे अंदाजपत्रक राहील. मूलभूत सोयी सुविधा याकडे लक्ष देण्यात येणार आहे. शाळांचे नूतनीकरण करण्याबरोबरच नवे तंत्रज्ञान उपयोगात आणले जाणार आहे..

#### अंदाजपत्रकामध्ये महिलांसाठी विशेष तरतूद

एक नवे व्हिजन घेऊन हे अंदाजपत्रक तयार करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकामध्ये युवकांना रोजगार देणे, उड्डाणपूलचा विषय मार्गी लावणे यालाही प्राधान्य देण्यात येणार आहे. महिलांसाठीही विशेष तरतूद करण्यात येणार आहे. सोलापूर शहराचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही स्पष्ट केले.

# जि.प.बांधकाम विभागाची २८० कामे पूर्ण; मार्चअखेर २५२ कामे पूर्ण करण्याचे आदेश

- कामांचा दर्जा राखा, मुदतीत कामे पूर्ण करा
- सीईओ कुलदीप जंगम यांचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मार्च-**

जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक १ व २ मार्फत २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण ५३२ कामांना मंजुरी देण्यात आली आहे. यापैकी आतापर्यंत २८० कामे पूर्ण झाली असून उर्वरित २५२ कामे मार्चअखेरपर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिल्या.

जिल्हा परिषदेमधील २०२४-२५ वर्षातील बांधकाम विभागाच्या कामांचा आढावा घेण्यासाठी सीईओ जंगम यांच्या अध्यक्षतेखाली



बैठक घेण्यात आली. या बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी आदी उपस्थित होते. बांधकाम विभाग क्रमांक १ कडे ३०५४ योजनेअंतर्गत २१५ कामे मंजूर करण्यात आली असून त्यापैकी ११९ कामे पूर्ण झाली आहेत, तर ९६ कामे सुरू आहेत. तर बांधकाम विभाग क्रमांक २ कडे २६० कामे मंजूर असून त्यापैकी १३१ कामे पूर्ण झाली असून १२९ कामे प्रगतिपथावर आहेत. ५०५४ योजनेअंतर्गत ५७ कामे मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी ३० कामे पूर्ण झाली. २७ कामे सुरू आहेत. बांधकाम विभाग १ कडील ३० पैकी १५ कामे पूर्ण तर १५ कामे अपूर्ण आहेत. बांधकाम विभाग २ कडील २७ पैकी १५ कामे पूर्ण, तर १२ कामे अपूर्ण असल्याची माहिती कार्यकारी अभियंत्यांनी दिली.

#### दर्जाहीन कामांवर कारवाईचे संकेत...

मंजूर करण्यात आलेल्या कामांचा दर्जा योग्य ठेवावा, निविदेतील अटी व नियमांचे काटेकोर पालन करावे. जी कामे मुदतीत पूर्ण होत नाहीत त्या ठेकेदारांना नोटीस द्यावी. दर्जाहीन कामे करणाऱ्या ठेकेदारांची चौकशी करून कारवाई करावी. सर्व कामे मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्यावर भर द्यावा, असेही त्यांनी सांगितले.

# कोणता तालुका पटकावणार यंदा जि.प. अध्यक्षपदाचा मान!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मार्च-**

सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात नवे समीकरण जुळून येत आहे. सोलापूर महापालिकेचे महापौर पद सर्वसाधारण खुला म्हणजेच मराठा समाजाला सुटल्यानंतर त्याठिकाणी ओबीसी महापौर विराजमान केला गेला. मराठा समाजबांधव आक्रमक झाले असून राजकीय अन्याया विरोधात आंदोलन करत आहेत. आता जिल्हा परिषद अध्यक्ष तरी समाजाला मिळावा अशी त्यांची मागणी आहे. यंदा अध्यक्षपदाचा मान कोणत्या तालुक्याला मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

चार वर्षांच्या प्रतीक्षेनंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्या आहेत. जिल्हा परिषदांमध्ये अध्यक्ष,



- अमावस्येच्या दिवशी सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्ष निवड
- पालकमंत्री गोरे, आ. कल्याणशेट्टी घेणार अध्यक्षपदाचा निर्णय

उपाध्यक्ष आणि सभापती पदांवर कोण विराजमान होणार याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. दरम्यान, ग्रामविकास विभागाच्या सूचनेनुसार जिल्हा प्रशासनाने सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीसाठी १८ मार्च रोजी विशेष बैठक बोलावली आहे. योगायोगाने या दिवशी अमावस्या असल्याने 'अमावस्येच्या दिवशी अध्यक्ष निवड' अशी चर्चाही रंगताना दिसत आहे. सध्या माढा लोकसभा मतदारसंघाचे अध्यक्ष चेतनसिंह केदार आणि वळसंग येथील जिल्हा परिषद सदस्य रामप्पा चिवडशेट्टी या दोन नावांची चर्चा सुरु आहे.

काही वर्षापूर्वी अकलूज, माढ्याकडे जिल्ह्याची राजकीय सूत्रे होती पण आता पालकमंत्री बाहेरचा असल्याने ते काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी कुणबी-मराठा समाजातील व्यक्तीला संधी द्यावी, अशी मागणी आंदोलनातून पुढे आली आहे. तर दुसरीकडे, आ. कल्याणशेट्टी यांच्या पत्नी शांभवी कल्याणशेट्टी यांनी अध्यक्षपदाच्या शर्यतीतून माघार घेतल्याची चर्चा आहे. त्यामुळे इच्छुक कार्यकर्त्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

# सोलापूरच्या बचतगटांना ३०० कोटींचा आर्थिक बूस्ट!

### २.५ लाख महिलांच्या स्वावलंबनाला नवे बळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मार्च-**

**सोलापूर जिल्ह्यातील महिला बचतगटांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी २०२६-२७ या आर्थिक वर्षात सुमारे ३०० कोटी रुपयांचे कर्जवाटप होणार आहे. केंद्र व राज्य शासनाकडून पुढील महिन्यात कर्जवाटपाचे उद्दिष्ट जिल्ह्याला मिळणार असल्याची माहिती 'उमेद' महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे यांनी दिली.**




गतवर्षी जिल्ह्यातील बचतगटांना बँकांकडून ३४० कोटी रुपयांचे कर्जवाटप झाले होते. महिलांनी कर्जाची नियमित परतफेड केल्यामुळे दरवर्षी कर्जवाटपाचा आकडा वाढत असल्याचेही त्यांनी सांगितले. सोलापूर जिल्ह्यात सध्या सुमारे २४ हजार २०० बचतगट कार्यरत आहेत. या बचतगटांशी अडीच लाखांहून अधिक महिला जोडलेल्या असून 'उमेद' अभियानाच्या माध्यमातून त्यांना आर्थिक व उद्योजकीय पाठबळ मिळत आहे. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील सुमारे एक लाख कुटुंबांना आर्थिक आधार मिळाला आहे.

#### ३० हजार महिलांनी सुरू केले स्वत:चे व्यवसाय

'उमेद'च्या मदतीने ३० हजारांहून अधिक महिलांनी स्वत:चे व्यवसाय सुरू केले आहेत. अनेक महिलांचे उत्पादने आता ब्रँडच्या रूपात बाजारात ओळख निर्माण करत आहेत.रुक्मिणी महोत्सवासारख्या कार्यक्रमांमध्ये तसेच राज्य शासन आयोजित विविध महोत्सवांमध्ये बचतगटातील महिला उद्योजकांना सहभागी होण्याची संधी मिळते. त्यामुळे त्यांच्या उत्पादनांना मोठी बाजारपेठ उपलब्ध होत आहे. बचतगटांतील महिलांनी विविध व्यवसाय सुरू करून स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारला आहे.

#### कर्जक्षमता वाढली

पूर्वी बचतगट ३० हजार ते १ लाख रुपये इतके कर्ज घेत होते. आता त्यांची आर्थिक क्षमता वाढून ३ ते १० लाख रुपयांपर्यंत कर्ज घेण्याची क्षमता निर्माण झाली आहे.बचतगटाला मिळालेली रक्कम सदस्य महिलांमध्ये समान वाटली जाते आणि त्या आपल्या व्यवसायासाठी त्याचा वापर करतात. महिलांकडून कर्जाची नियमित आणि वेळेवर परतफेड केली जात असल्यामुळे बँकांचा विश्वासही वाढला आहे. बचत गटांमुळे महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढतो आणि त्यांचा आत्मविश्वास उंचावतो. अनेक गट पापड, लोणची, शिवणकामाचे उद्योग यशस्वीपणे चालवत आहेत.

**सोलापूर जिल्ह्यातील बचतगटांचा आढावा**

| | |
|---|---|
| एकूण बचतगट | २४,२०० |
| संलग्न महिला | सुमारे २.५० लाख |
| २०२६-२७ कर्जवाटप उद्दिष्ट | ३०० कोटी रुपये |
| २०२५-२६ कर्जवाटप | ३४० कोटी रुपये |
| **तीन लाखांपर्यंत कर्जावर ७% व्याज** बँकांकडून कर्ज घेऊन त्याची नियमित परतफेड करणाऱ्या बचतगटांना १० लाखांपर्यंत कर्ज उपलब्ध होते. | |
| ३ लाखांपर्यंत कर्ज | सुमारे ७ टक्के व्याजदर |
| त्यापुढील कर्जावर बँकेनुसार व्याजदर बदलतो. | |
| १ लाखांपर्यंतचे कर्ज वेळेत फेडल्यास व्याजाचा परतावा सरकारकडून दिला जातो. | |
| सोलापूर जिल्ह्यातील ९५ टक्क्यांहून अधिक बचतगटांनी कर्जाची नियमित परतफेड केल्याने हा उपक्रम यशस्वी ठरत आहे. | |

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



महत्वाचे...



## अक्कलकोटमध्ये स्वामी समर्थ फेम अक्षय मुडावदकर यांचा सत्कार

**अक्कलकोट दि. ६ मार्च -**

येथील कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयात श्री.स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ या मराठी मालिकेतील श्री स्वामी समर्थांच्या भूमिकेतील कलाकार अक्षय मुडावदकर यांचा प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सत्कार करण्यात आला. कै. कल्याणराव इंगळे यांच्या जयंती निमीत्त वटवृक्ष मंदीरात कलाकार अक्षय मुडावदकर व चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते भाविकांना केळी प्रसाद वाटप करण्यात आले. प्रगतीपथावर असलेल्या व लवकरच लोकार्पण होणाऱ्या देवस्थानच्या मैंदर्गी रोडवरील समर्थ पार्क हद्दवाढ भागातील कै.कल्याणराव इंगळे स्मृती उद्यान व वटवृक्ष स्पोर्टस् अॅकॅडमीला अक्षय मुडावदकर यांनी सदीच्छा भेट दिली.

## गर्भाशय मुखाच्या कर्करोगाविषयी उद्या मार्गदर्शन कार्यक्रम

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे निदान, उपचार व प्रतिबंधक लसीकरण या विषयावर तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शनपर व्याख्यान ८ मार्च रोजी हॉटेल बालाजी सरोवर येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती डॉ. आयएसपीएटीचे अध्यक्ष डॉ. मिलिंद शहा यांनी पत्रकार परिषदेत दिली. हा कार्यक्रम सोलापूर ओबीसीतेत्रिक्स अँड गायनाइकॉलॉजिकल सोसायटी (स्त्री रोग व प्रसूती शास्त्र संघटना, सोलापूर) आणि इंडियन मेडिकल असोसिएशन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात डॉ. रोहिणी देशपांडे या गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला कारणीभूत ठरणाऱ्या ह्यूमन पपईल्लोमाविरस (एचपीव्ही) विषाणूविषयी मार्गदर्शन करणार आहेत. तसेच डॉ. मिलिंद शहा हे एचपीव्ही प्रतिबंधक लसीकरण या विषयावर माहिती देणार आहेत. या पत्रकार परिषदेस एसओजीएसच्या अध्यक्षा डॉ. सुजाता कुलकर्णी, सचिवा डॉ. केतकी जोशी, इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. मंजूषा शहा आदी उपस्थित होत्या.



## ई-चलन दंडावर जाहीर केलेली ५० टक्के सूट लागू करण्याची मागणी

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

हिवाळी अधिवेशनात फोटोशूट ई-चलन दंडावर ५०% सूट देण्याची घोषणा केली होती. राज्यातील लाखो वाहनचालकांनी या निर्णयाचे स्वागत केले होते आणि शासनाकडून तात्काळ अंमलबजावणीची अपेक्षा व्यक्त केली होती. वाहतूक संघटना संयुक्त महासंघाच्या वतीने राज्य सरकारकडे मागणी करण्यात येते की, हिवाळी अधिवेशनात जाहीर केलेली ई-चलन दंडावर ५० टक्के सूट तात्काळ लागू करण्यात यावी व तोपर्यंत सुरू असलेली दंड वसुली मोहीम तात्पुरती थांबविण्यात यावी. यावेळी प्रदीप शिंगे, इरफान कल्याणी, इम्रान शेख, शंकर राऊत, मनोज खांडेकर, अशोक बनसोडे, अप्पू सुतार, अफसर पिरजादे, फैयाज काझी, सचिन शिर्के, सैफन शेख उपस्थित होते. जर शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेतला नाही तर राज्यातील चालकांच्या न्याय्य हक्कांसाठी वाहतूक संघटना संयुक्त महासंघाच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. वाहतूक संघटना संयुक्त महासंघाचे प्रदेश अध्यक्ष रियाज सय्यद यांनी दिला.

## संत बाळूमामा उत्सवानिमित्त बेलाटी येथे विविध कार्यक्रम

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथील श्री संत बाळूमामा मंदिरात ९ ते २० मार्च या कालावधीत विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील बेलाटीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. दरवर्षीप्रमाणे यंदाही आदमापूरप्रमाणेच बेलाटी येथील विजापूर बायपास रोड जवळील श्री संत बाळूमामा मंदिर ट्रस्टतर्फे संत बाळूमामा उत्सव साजरा करण्यात येणार आहे.सोमवार,९ मार्च रोजी मंदिरामध्ये वात घालणे व वीणापूजन कार्यक्रम होणार असून याच दिवशी उपवासास सुरुवात होईल. सोमवार, १६ मार्च रोजी उत्सवाची सांगता व उपवास सोडण्यात येईल. ९ ते १६ मार्च या कालावधीत मंदिरात कीर्तन, भजन, महाआरती व महाप्रसाद यांच्यासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार,१५ मार्च रोजी श्री संत बाळूमामा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. बुधवार,१८ मार्च रोजी अमावास्यानिमित्त सकाळी ६ वाजता संत बाळूमामांच्या मूर्तीला अभिषेक, सकाळी ७ वाजता महाआरती व महाप्रसाद होणार आहे. सकाळी ७ ते सायंकाळी ७ या वेळेत दिवसभर धनगरी ओव्या, भजन व पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ वाजता महाआरती होईल. तसेच गुरुवार,१९ मार्च रोजी गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर श्रीराम मंदिर भूमिपूजन सोहळा मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.शुक्रवार,२० मार्च रोजी श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकटदिन श्री संत बाळूमामा मंदिरात साजरा करण्यात येणार असून दुपारी १२.३० वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांच्या अधिष्ठानाजवळ गुलालाचे कीर्तन होणार आहे. या पत्रकार परिषदेस सिद्धारूढ बेडगनूर, कपिल कोळी, बाळासाहेब पाटील, आत्माराम रुपनर उपस्थित होते.

# तहसीलदारांना वाहनाखाली घालून ठार मारण्याची धमकी

## दहा, बारा दुचाकींवर व कारमध्ये येऊन वाळूमाफियांनी महसूल कर्मचाऱ्यांना घातला घेराव, तहसील कचेरी समोरच घडला प्रकार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ मार्च-**

वाळू कारवाईकरिता फिरता काय, सरकारी वाहनातून वाळू कारवाई करता काय असे म्हणून तुम्हाला व तहसीलदार यांना बघून घेतो अशी दमाबाजी करुन शिवीगाळ केली तसेच महसूल कर्मचाऱ्यांना अन् तहसीलदारांना वाहनाखाली घालून ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी वाळूमाफियांविरुद्ध पोलिस ठाण्यात गुरुवारी संध्याकाळी गुन्हा दाखल झाला आहे.

येथील तहसीलदार सचिन लंगुटे यांनी नेमलेल्या पथकातील पंढरपूर ग्राम महसूल अधिकारी रविकिरण भीमराव लोखंडे, सांगवीचे ग्राम महसूल अधिकारी मंगेश श्रीपती बनसोडे, करोळेचे ग्राम महसूल अधिकारी रामदास बळीराम खंदारे, उंबरेगावचे ग्राम महसूल अधिकारी प्रदीप पांडुरंग कोईगडे हे सर्व सदस्य ४ मार्च ते ५ मार्च रोजी सकाळी आठ वाजेपर्यंत गस्त घालण्यासाठी शासकीय (क्रं.एम. एच.१३ डी.टी.१९१३) या क्रमांकाच्या वाहनासह पंढरपूर तहसील कार्यालयातून निघाले. पंढरपूर रेल्वेपुलानजीक नदीपात्र, चंद्रभागा बंधारा, पासष्ठ एकर परिसर, तीन रस्ता चौक, अहिल्याचौक, खेडभोसे, शेळवे येथून तहसील कार्यालय पंढरपूर येथे परत आले.

त्यानंतर दीड वाजता पुन्हा ते गस्तीकरिता तहसील कार्यालयातून त्यांच्या खाजगी मोटारसायकलने बाहेर पडले. दरम्यान कार्यालयाचे गेटसमोरी रोडवर ते आले असता तेथे अंदाजे १० ते १२ दुचाकी वाहनांवर व कारमध्ये अनोळखी लोक आले. त्यांनी कर्मचाऱ्यांच्या मोटारसायकलला त्यांच्या मोटारसायकली आडव्या लावून, घेराव घालता. कर्मचाऱ्यांना वाळू कारवाईकरिता फिरता काय, सरकारी वाहनातून वाळू कारवाई करता काय असे म्हणून कर्मचाऱ्यांना व तहसीलदारांना वाहनाखाली घालून ठार मारतो अशी धमकी देऊन मोठमोठ्याने वाहनांची रेस करुन तेथून निघून गेले. या प्रकरणी ग्राम महसूल अधिकारी रविकिरण भीमराव लोखंडे (वय ३३, रा. इसबावी, पंढरपूर) यांनी तक्रार दिली आहे.

### वाळू तस्कर वर्षासाठी येरवडा कारागृहात स्थानबद्ध

पंढरपूर शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैधरीत्या वाळू उपसा करून ती बेकायदेशीरपणे विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या आणि शरीराविषयक गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार सूरज ऊर्फ अंबान्या दत्तात्रय पवार (रा.फूट रस्ता, कोर्टी, ता.पंढरपूर) याला एमपीडीए कायद्यांतर्गत एक वर्षासाठी येरवडा कारागृहात स्थानबद्ध केल्याचे पोलिस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांनी सांगितले.अवैधरीत्या वाळू चोरी करणे, ती विक्री करणे सोयीचे व्हावे यासाठी दहशत माजवण्यासाठी वाळूच्या कारणावरून जीवघेणे हल्ले करणे, पंढरपूर शहर व लगतच्या परिसरातील लोकांना दमदाटी, मारहाण करून, गौण खनिज (वाळू) चोरी करण्याची त्यास सवय होती. त्याच्याविरुद्ध अनेकवेळा वाळू व्यवसाय, शरीराविषयी गुन्हे दाखल होऊन त्यामध्ये अटक केली होती. परंतु, तो सदर गुन्ह्यात जामीन मिळवून अवैध वाळू व्यवसाय अव्याहतपणे सुरूच होता. त्यास ताब्यात घेऊन पुणे येथील येरवडा मध्यवर्ती कारागृहामध्ये एक वर्षाकरिता स्थानबद्ध करण्यात आले आहे.




## वेळापूर इंग्लिश स्कूलमध्ये जागतिक महिला सक्षमीकरण सप्ताह साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.६ मार्च-**

इंग्लिश स्कूल वेळापूर प्रशालेत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय योगदानाची दखल घेऊन त्यांना सन्मान ,समानता व सक्षमीकरण देण्याच्या उद्देशाने दोन मार्च ते आठ मार्च दरम्यान जागतिक महिला सक्षमीकरण सप्ताह साजरा करण्यात आला.

ज्येष्ठ शिक्षिका देवकते यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आर. बी. पवार होते. प्रमुख मार्गदर्शिका शिवम हॉस्पिटलचे तज्ञ डॉ. उर्मिला पाटील यांचा परिचय शिक्षिका गोरे यांनी करून दिला. डॉ.पाटील यांनी महिलांचा आहार, वेगवेगळे आजार, खाण्या-पिण्याच्या नको त्या सवयी, मोबाईलचे परिणाम, व्यायामाचे महत्व इत्यादी बाबीवर मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी उपमुख्याध्यापक पठाण, शिवशरण , पर्यवेक्षक बी.एस. सावळे, सर्व महिला शिक्षिका उपस्थित होते. सौ देवकते यांनी सूत्रसंचालन केले. नामदेव बावचे यांनी आभार मानले.

## शेळगावजवळ कारच्या धडकेत दोन तरुण ठार

### दोघेही गावडी दारफळ गावचे; गावावर शोककळा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.६ मार्च -**

सोलापूर-बार्शी मार्गावरील शेळगाव शिवारात बुधवारी दुपारी एक भीषण अपघात घडला. कार आणि दुचाकी यांच्यात झालेल्या या जोरदार धडकेत दुचाकीवरील दोन तरुण जागीच ठार झाले आहेत. राहूल संदीपान पवार (वय ३७) आणि गणेश महादेव क्षीरसागर (वय ३२) अशी मृतांची नावे असून, दोघेही उत्तर सोलापूर तालुक्यातील गावडी दारफळ गावचे रहिवासी होते.

मिळालेल्या माहितीनुसार, राहूल आणि गणेश हे दोघे मळणी यंत्राच्या (थ्रेशर) दुरुस्तीसाठी बार्शी येथे गेले होते. काम आटोपून ते आपल्या दुचाकीवरून गावाकडे परतत असताना काळाने त्यांच्यावर झडप घातली. दुपारी चारच्या सुमारास शेळगाव शिवारात आले असताना, सोलापूरहून वैरागच्या दिशेने जाणाऱ्या एका टाटा अल्ट्रोझ कारने (एमएच १३ इएस ४५३०) त्यांच्या दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली.

ही धडक इतकी भीषण होती की, कार आणि दुचाकी दोन्ही वाहनांचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघातानंतर तातडीने दोघांनाही शासकीय रुग्णालयात नेण्यात आले, परंतु डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले.


राहुल पवार


गणेश क्षीरसागर

### गावावर शोककळा

ऐन उमेदीच्या दोन तरुणांचा असा अपघाती मृत्यू झाल्याची बातमी समजताच गावडी दारफळ गावावर शोककळा पसरली आहे. दोघेही तरुण कष्टाळू आणि मनमिळावू स्वभावाचे असल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. गणेश क्षीरसागर यांच्या पश्चात पत्नी आणि अडीच वर्षांचा मुलगा असा परिवार आहे. राहूल पवार यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुली असा परिवार आहे. याप्रकरणी पोलिसांनी नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

## जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्या जिल्हाध्यक्षपदी दयानंद परिचारक; महिला जिल्हाध्यक्षपदी मृणाली शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.६ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषद कर्मचारी युनियन जिल्हाध्यक्षपदी कनिष्ठ प्रशासन अधिकारी दयानंद परिचारक आणि महिला जिल्हाध्यक्षपदी विस्तार अधिकारी (सां) मृणालिनी शिंदे यांची निवड करण्यात आली आहे.




यावेळी स्वर्गीय विवेक लिंगराज यांना प्रतिमापूजनाने आदरांजली वाहण्यात आली. महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियनचे राज्याध्यक्ष बाबुराव पुजरवाड यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी जिल्हा उपाध्यक्षपदी विशाल घोगरे, कनिष्ठ सहायक व कार्याध्यक्षपदी शिवाजी राठोड, कनिष्ठ सहायक तसेच उपाध्यक्ष श्रीमती सविता काळे, परिचर व कार्याध्यक्षपदी स्वाती स्वामी विस्तार अधिकारी (शिक्षण) यांची जिल्हा कार्यकारणी बैठकीत एकमताने निवड करण्यात आली. उर्वरीत जिल्हा, तालुका पदाधिकारी, कार्यकारणी विस्तार लवकरच अध्यक्ष, सचिव यांच्या नेतृत्वाखाली केला जाणार असल्याचे यावेळी सांगितले. बैठकीस पतसंस्था क्र. १ चे व्हा.चेअरमन श्रीधर कलशेट्टी, माजी जिल्हाध्यक्ष तजमुल मुतवल्ली, जिल्हा शाखा पदाधिकारी विलास मसलकर, अजय भोसले, राकेश सोडी, संतोष शिंदे, चेतन वाघमरे, श्रीशैल देशमुख, रोहीत घुले, विक्रम शहा, लेखा संघटनेचे अध्यक्ष अनिल बिराजदार, राजगुरु, दत्ता घोडके, कटकधोंड, किरण लालबोंद्रे, मिस्त्री, योगेश हब्बु, योगेश खंडागळे, मठपती, म्हेत्रे, सचिन पवार, गुरव,अभिमन्यु कांबळे, नागेश कोमारी, शहाजहान तांबोळी, महेश वैद्य, नितीन शिदे, सतीश ऊनवणे पाटील, कमलेश खाडे तसेच महिला प्रतिनिधी निर्मला राठोड, गोदावरी राठोड, आरती माढेकर, राजगुरु व इतर कार्यकारणी सदस्य, कर्मचारी उपस्थित होते.

> निःपक्ष, निःस्वार्थ, निर्भिडपणे सर्व कर्मचारी यांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करण्यात येथील कर्मचाऱ्यांचे हक्क व आत्मसन्मान राखण्यात येईल. कै. विवेक लिंगराज यांच्या विचाराप्रमाणेच सर्वांचे सहकार्याने कामकाज करू सर्व कर्मचाऱ्यांच्या अडचणी प्रशासनासमोर मांडू. अन्याय झाल्यास प्रशासनाशी भांडू असे मनोगत व्यक्त केले.
> - **दयानंद परिचारक,** जिल्हाध्यक्ष, सोलापूर जिल्हा परिषद कर्मचारी युनियन.




## श्रीराम जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या अध्यक्षपदी डॉ. कोठे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

श्रीराम जन्मोत्सव सोलापूर मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने आयोजित श्रीराम नवमी उत्सव २०२६ च्या अध्यक्षपदी डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांची निवड करण्यात आली.

श्रीराम नवमी निमित्ताने श्रीराम भक्तांसाठी डॉक्टर सूर्यप्रकाश कोठें च्या वतीने ५१ श्रीरामांच्या मूर्ती देण्यात येणार आहेत. येत्या श्रीराम नवमी उत्सव अधिक भव्य, दिव्य आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्याचा निर्धार यावेळी डॉ.सूर्यप्रकाश कोठे यांनी व्यक्त केला. यावेळी जिल्हा सरकारी वकील अॅड. प्रदीप राजपूत, नगरसेवक बिज्जू प्रधान, रवि बंडे, अॅड. दत्ता पवार, मदन मोरे, शिवराज पाटील, सुधीर बहिरवाडे, संदीप जाधव, समर्थजी बंडे उपस्थित होते.

## वेळापुरात आज मोफत आरोग्य शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ६ मार्च-**

वेळापूर येथे आमदार उत्तमराव जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सेवासदन मल्टिस्पेशालिटी मिरज यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. ७ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबिराचे उद्घाटन खा. धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार उत्तमराव जानकर तसेच डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील, डॉ. एम. के. इनामदार, डॉ. किशोर गिरमे, डॉ. विश्वजीत कदम आणि डॉ. स्नेहल जानकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी जि.प.सदस्य अर्जुनसिंह मोहिते-पाटील, निलावती ठवरे, सुषमा नारनवर, गौतम माने, नागनाथ भोसले, मारुती लोढे, मिनाक्षी सरतापे यांच्यासह पं.स. सदस्य विमलताई जानकर, वैष्णवीदेवी मोहिते-पाटील, रेश्मा माने, दत्ता मगर, अॅड. प्रवीण वाघमोडे, सोनाली पाटील, मीनाक्षी पाटील, निशा गिरमे, मीनाक्षी नाईकनवरे, महादेव साबळे, युवराज झंजे, आप्पासो पाटील तसेच माजी जि.प. सदस्य सतीशराव माने-देशमुख, सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगुस्कर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शिबिरात तपासणी व मार्गदर्शन होणार आहे. डोळे, नाक,घसा, दंत तपासणीसह दमा, एलर्जी, त्वचारोग, हृदयविकार, डायबिटीज, थायरॉईड, संधिवात, पोटाचे विकार यासह विविध आजारांची तपासणी केली जाणार आहे. रक्त, लघवी तपासणी, सोनोग्राफी, ईसीजी, शुगर, कोलेस्टेरॉल, क्रिएटीनिन, रक्तातील पांढऱ्या कणांची तसेच मोफत कॅन्सर तपासणीही करण्यात येणार आहे. आयोजन अमोल (भैय्या) पनासे मित्र परिवारातर्फे करण्यात आले आहे. वेळापूर परिसरातील नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन पनासे यांनी केले आहे.

## आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर बार्शी शहर पोलिस ठाण्यात शांतता समितीची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ मार्च-**

आगामी शिवजयंती (तिथीनुसार), रंगपंचमी, गुढीपाडवा, रमजान ईद व रामनवमी या सणांच्या पार्श्वभूमीवर बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुरुवारी दि. ५ मार्च रोजी शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सर्व धर्मीय नागरिकांनी सामाजिक सलोखा राखत सण उत्सव साजरे करण्याचे आवाहन पोलिस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी केले आहे.

सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांच्या सूचनेनुसार तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी शहर पोलीस ठाण्यात दुपारी ही बैठक पार पडली. बैठकीस शहरातील सर्व जाती-धर्मांतील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना धार्मिक सलोखा व सामाजिक ऐक्य जपण्याबाबत आवाहन करण्यात आले. छोट्या कारणांवरून निर्माण होणारे वाद किंवा लहान मुलांमधील किरकोळ भांडणांना जाती-धर्माचा रंग देऊन मोठे स्वरुप देण्याच्या घटना टाळाव्यात. अशा प्रकारच्या वादांपासून सर्वांनी सतर्क राहून आपापसांत समन्वय साधून वाद मिटवावेत तसेच कोणताही वाद उद्भवल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलिस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी केले आहे. तसेच शहरातील प्रत्येक प्रभागात मोहल्ला कमिटीचे सदस्य निवडून स्थानिक पातळीवर किरकोळ वाद संवादातून मिटविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सण-उत्सव शांततेत व बंधुभावाने साजरे करण्यासाठी नागरिकांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असेही यावेळी सांगण्यात आले. ध्वनीप्रदूषणाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व प्रचलित कायद्याच्या तरतुदींचे पालन करणे बंधनकारक असल्याचे सांगण्यात आले. कोणत्याही कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपक (स्पीकर) वापरण्यापूर्वी पोलीस प्रशासनाची परवानगी घेणे आवश्यक आहे. अधिकृत धार्मिक स्थळांनाच स्पीकर बसविण्याची परवानगी दिली जाणार असून सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये ध्वनीप्रदूषणासंबंधी दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, अन्यथा संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलिसांकडून देण्यात आला.



# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## वाळू तस्कर सुरज पवार स्थानबध्द

**सोलापूर, दि. ६ मार्च-**
पंढरपूर शहर पोलिसांनी अवैध वाळू तस्करी करणाऱ्या सराईत आरोपी नामे सुरज उर्फ अंवान्या दत्तात्रय पवार रा. फुट रस्ता, कोर्टी ता. पंढरपूर यांचे विरुद्ध कठोर कारवाई करत त्यास महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा अंतर्गत एक वर्षासाठी स्थानबद्ध केले आहे.

सदर आरोपी हा पंढरपूर शहरात व परिसरामध्ये अवैधरित्या वाळू तस्करी करून त्यातून आर्थिक फायदा मिळवत होता. तसेच या बेकायदेशीर धंद्यातून मिळालेल्या पैशाच्या बळावर परिसरात दहशत निर्माण करून नागरिकांवर हल्ले करणे, धमक्या देणे तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचविणारे विविध गुन्हे करीत होता. आरोपीविरुद्ध यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. आरोपी विरुद्ध महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा अंतर्गत प्रस्ताव पोलीस निरीक्षक, दशरथ वाघमोडे, पंढरपुर शहर यांनी स्थानिक गुन्हे शाखा, सोलापुर ग्रामीण यांचेकडे पाठविला होता. सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे पाठविण्यात आला. जिल्हाधिकारी यांनी एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचे आदेश पारित केले. आरोपीस ताब्यात घेऊन त्याची रवानगी येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे



करण्यात आली आहे.सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी सो (भा.पो.से), अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, सहा. पोलीस अधीक्षक, प्रशांत डगळे (भा.पो.से), पंढरपूर विभाग, पंढरपुर, पोलीस निरीक्षक संजय जगताप, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापुर ग्रामीण, पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, पंढरपूर शहर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली, सपोफौ कल्याण ढवणे, पोलीस हवा सचिन इंगळे, सचिन हेबाडे, दिपक नवले, हर्षद ठाकर, स्थानिक गुन्हे शाखेचे अनिस शेख तसेच सायबर सेलचे रतन जाधव यांनी केली आहे.



### महत्त्वाचे




## २० घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू वाटप

**दक्षिण सोलापूर, दि. ६ मार्च-**
अप्पर तहसील कार्यालयाकडून पात्र घरकुलधारकांना विनामूल्य पाच ब्रास वाळू पैकी प्रत्येकी दोन ब्रास वाळू मोफत वाटप करण्यात आले. मोफत वाळू वाटपामुळे तालुक्यातील घरकुलधारकांनी तहसीलदार विष्णू बुटे यांचे कार्याबाबत समाधान व्यक्त केले. वाळू वाटप करताना मंडळ अधिकारी राणा वाघमारे, तलाठी गणेश भुजबळ, पिरप्पा आवटे, वाळू ठेकेदार सुरेश काटगाव यांच्या उपस्थितीमध्ये २० घरकुलधारकांना मोफत वाळू वाटप केले. तसेच पात्र घरकुल लाभार्थ्यांना माळकवठे येथील ७ मार्च रोजी होणार्या महाराजस्व समाधान शिबिरामध्ये मोफत वाळू वाटप पास वितरित करण्यात येणार असल्याचे मंडळ अधिकारी वाघमारे यांनी सांगितले.

## अज्ञात कारणाने तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या; मंद्रुपमधील घटना

**दक्षिण सोलापूर, दि. ६ मार्च-**



शुक्रवारी पहाटे मंद्रुपमधील एका तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. अभिजित सतीश मेंडगुदले वय २५ राहणार मंद्रूप असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे. अभिजित मेंडगुदले यांनी सकळेश्वर मंदिराजवळ राहत्या घरी स्लॅबच्या पंख्याला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची फिर्याद सुमित मेंडगुदले वय २७ यांनी दिली आहे. त्यांच्या पश्चात आई, वढील, भाऊ असा परीवार आहे. तपास हवालदार सचिन मसलखांब करीत आहेत.




## केमच्या सचिन जाधव यांची पोलिस उपनिरीक्षकपदी निवड

**जेऊर, दि. ६ मार्च-**
महाराष्ट्र लोकसेवा आयोग सन २०२४मध्ये झालेल्या पोलिस उपनिरीक्षक परीक्षा चा निकाल लागला असून या मध्ये केमचे सुपूत्र सचिन मच्छिंद्र जाधव यांची पोलीस उपनिरीक्षक महाराष्ट्र पीएसआय २५वी रँक पदी निवड झाली आहे सचिन जाधव यांचे माध्यमिक शिक्षण श्री ऊत्तरेश्वर हायस्कूल मध्ये तर पदवी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथे झाले त्यानी पुणे येथे राहून एम,पी,एस,सी अभ्यास केला त्याची परिस्थिती बेताची आई,वडिल मंजुरी करतात तर भाऊ प्रायव्हेट कंपनीत कामाला आहे काय तो भाऊचा आधार अस्या परिस्थितीतीवर मात करीत त्याने हे यश संपादन केले. ही बातमी केम येथे समजतात ग्रामस्थानी जल्लोष साजरा करून सचिनला शुभेच्छा दिल्या. त्याने यशाचे श्रेय आपले. आई, वडिल व भाऊला समापिर्त केले.



## सोलापूरात तिथीप्रमाणे शिवजयंती साजरी

**सोलापूर, दि. ६ मार्च-**
हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीप्रमाणे जयंती भक्तीभाव आणि अभिमानाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थान यांच्या वतीने नवी पेठ येथील शिवस्मारक परिसरात महाआरती, अभिवादन आणि जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १० वाजता कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित शिवभक्तांनी छत्रपती शिवाजी महाराज की जय, हर हर महादेव अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून टाकत महाराजांची महाआरती केली. यावेळी संस्थापक अध्यक्ष मारुती सुरवसे, सचिन कोकाटे, सारंग साठे, श्रीकांत मोरे, अप्पु माळी, स्वप्निल सावळगी, राहुल बाके, अभिषेक पवार, ऋतुराज पाटील, धनराज पाटील, इंद्रायणी कोकाटे उपस्थित होते.

## करकंबमध्ये महिला सक्षमीकरण सप्ताह

**करकंब, दि. ६ मार्च-**
गरोदर मातांसाठी डोहाळ जेवण, नवजात बालकांच्या माता, त्यांची मुले, मुली यांचा सत्काराने करकंब परिसरातील अंगणवाडी मध्ये महिला सक्षमीकरण सप्ताह करण्यात आला. आरोग्य व अंगणवाडी विभागातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विविध मान्यवर व माता, भगिनींच्या हस्ते हा कार्यक्रम झाला. यानिमित्ताने अंगणवाड्यांची सजावट करून फुलांच्या वर्षावात माता त्यांची मुले, मुलींचे स्वागत करण्यात आले. बालकांसाठी अन्नप्राशनाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला. हा उपक्रम यशस्वी व्हावा यासाठी अंगणवाडी अधिकारी दिपाली कोकाटे, अंगणवाडी सेविका, मदतनीस, महिला, सरपंच, उपसरपंच शालेय व्यवस्थापन समिती यांनी सहभाग घेतला. उपस्थित माता, लहान मुले व उपस्थितांना सकस आहाराचे वाटप करण्यात आले. अंगणवाडी सेविका,व मदतनीस यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मोडनिंबमध्ये मध्यरात्री उभारला शिवरायांचा पुतळा

### पोलिस बंदोबस्त तैनात; वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.६ मार्च -**
माढा तालुक्यातील मोडनिंब येथे आज (दि.६) मध्यरात्रीच्या सुमारास ग्रामपंचायत कार्यालयासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला. अचानक झालेल्या या घटनेमुळे संपूर्ण महसूल आणि पोलिस प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. आज पहाटे साधारण चारच्या सुमारास फटाक्यांच्या आवाजाने मोडनिंबकरांना जाग आली.

नागरिक बाहेर आले असता, ग्रामपंचायत परिसरामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा दिमाखात उभा असल्याचे दिसून आले. ही बातमी वाऱ्यासारखी पसरताच सकाळपासूनच पुतळ्याच्या दर्शनासाठी आणि पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. पुतळा पाहण्यासाठी सकाळपासूनच





नागरिकांची गर्दी होत होती.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी मोहोळ येथे छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळाही उभारण्यात आला होता. तसेच माढा तालुक्यातील पडसाळी येथे मागील दोन वर्षांपासून परवानगी नसल्याच्या कारणास्तव झाकून ठेवलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावरील कापड काही दिवसांपूर्वी काढण्यात आले होते. या घटनेची माहिती मिळताच पोलिस अधिकारी अंजना कृष्णा, टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नारायण पवार, गटविकास अधिकारी सुळे यांनी पाहणी केली. याठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**पोलिस प्रशासनाकडून पाहणी :** पोलिस अधिकारी अंजना कृष्णन , टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नारायण पवार, गटविकास अधिकारी सुळे यांनी पाहणी केली. या घटनेची माहिती मिळताच टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नारायण पवार यांनी तातडीने पथकासह घटनास्थळी धाव घेतली.याठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्यांनी पुतळ्याची पाहणी केली असून, या पुतळ्यासाठी आवश्यक असणारी शासकीय परवानगी घेण्यात आली होती की नाही, याबाबत प्रशासनाकडे सविस्तर चौकशी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**शिवप्रेमींचा जल्लोष :** शहरात ग्रामपंचायत कार्यालय समोर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारल्याची माहिती मिळताच मोडनिंब व परिसरातील शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने घटनास्थळी धाव घेतली. यावेळी शिवप्रेमींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच फटाक्यांची आतषबाजी करत व छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडत जल्लोष साजरा केला. नागरिकही मोठ्या संख्येने पुतळा पाहण्यासाठी ग्रामपंचायत परिसरात जमा झाले होते.

## विज्ञानातील गरुडझेप : कुसूरच्या ३ प्रकल्पांची 'इन्स्पायर'साठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर,दि.६ मार्च-**
भारत सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या यंदाच्या 'इन्स्पायर अवॉर्ड' साठी कुसूर (ता. दक्षिण सोलापूर) येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल येथील अल्फिया शेख, निशांत कोळी आणि धर्मण्णा कोळी या तीन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

'इन्स्पायर अवॉर्ड' मध्ये निवड होण्याचे या विद्यालयाचे हे सलग सहावे वर्ष आहे. यापूर्वी देखील या शाळेतील ५ उपकरणांनी राज्यस्तरापर्यंत मजल मारली आहे. सोलापूर जिल्ह्यातील एकूण ७४ विद्यार्थ्यांची १५ व्या जिल्हास्तरीय प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली आहे. केवळ विज्ञानच नव्हे, तर एन.एम.एम.एस., शिष्यवृत्ती परीक्षा आणि गांधी विचार परीक्षा अशा विविध उपक्रमांतही यशाची परंपरा आहे. मुख्याध्यापिका चंद्रकला भोरे यांनी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना सातत्याने प्रोत्साहन दिले.

जेष्ठ शिक्षक दत्तात्रय पवार, देवानंद महामुनी, सचिन पाटील, संतोष पाटील, सेवक वसंत ताकम



ोगे, रशीद शेख यांचे सहकार्य लाभले. या यशाबद्दल चेअरमन चंद्रकांत दळवी, संघटक डॉ. अनिल पाटील, सचिव विकास देशमुख, विभागीय चेअरमन संजीव पाटील, सहसचिव बी. एन. पवार, विभागीय अधिकारी जगदाळे, उपविभागीय अधिकारी दाभाडे, निकम, गटशिक्षणाधिकारी सुतार, विस्ताराधिकारी गुरुबाळा सनके, कलबुर्गी, बाळप्पा नांगरे, माजी मुख्याध्यापक संजय जोशी, स्थानिक स्कूल समितीचे सदस्य सुनीलकुमार नांगरे, अशोक बिराजदार, व्यवस्थापन समिती अध्यक्ष सिद्धाराम विंचुरे, प्रगतशील बागायतदार गजानन दसगोंडे, सरपंच लक्ष्मी नरोटे, माता पालक संघ, माजी विद्यार्थी संघ यांच्यासह पंचक्रोशीतील समस्त ग्रामस्थांनी आणि पालकांनी अभिनंदन केले.

## पिलीवच्या शिवराणी मदनेची इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड

**पिलीव दि ६ मार्च-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव जवाहरलाल शेतकी विद्यालयामधये इयत्ता नववीत शिकणारीशिवराणी युवराज मदने हिची इन्स्पायर वारड मानांकना साठी निवड झाली आहे. तिच्या ह्या निवडीबद्दल स्थानिक स्कूल कमिटी अध्यक्ष राजेंद्रसिह जहागिरदार, महालक्ष्मी इंग्लिश स्कूलचे संस्थापक प्रशांत मदने, लहु पाटील, अज्ञान मदने, मुख्याध्यापक देशमुख, मार्गदर्शक शिक्षक मोरेसह आदींकडून कौतुक होत आहे.



## लाच स्वीकारताना मंडल अधिकाऱ्यावर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.६ मार्च -**
संगेवाडी, ता.सांगोला येथील मंडल अधिकारी यांच्यावतीने तक्रारदाराकडून त्यांच्या खाजगी वाहन चालकाने लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी गुरुवार दि.५ मार्च रोजी कारवाई केली.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कामगिरी**

आईचे नावे खरेदी केलेल्या शेतजमीनीच्या खरेदी दस्तावर प्राप्त हरकतीचे निकाल तक्रारदार यांच्या बाजुने लावून तक्रारदार यांच्या आईचे नावे केलेल्या खरेदीची नोंद ग्राह धरून त्यांचे नाव सातबारा उता-यावर लावण्यासाठी तक्रारदार विनोद सातपुते यांच्याकडे संगेवाडी मंडल अधिकारी विजया नाईक यांच्यावतीने त्यांचा खाजगी वाहन चालक वैभव मोरे याने १० हजार रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती ७ हजार रू. मागणी केली.


या तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांच्या वतीने गुरुवार दि.५ मार्च रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान मंडल अधिकारी विजया नाईक यांचे खाजगी वाहनाचे चालक वैभव मोरे याने तक्रारदार विनोद सातपुते यांच्याकडून ७ हजार रू.लाचेची रक्कम स्वतः स्वीकारताना कारवाई केली. पुढील तपास अँटी करप्शन ब्युरो, सोलापूरचे पोलीस निरीक्षक शैलेश पवार करीत आहेत.

## मोडनिंब येथे जगद्गुरू संत तुकाराम महाराज बीज सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.६ मार्च-**
विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म! भेदाभेद भ्रम अमंगळ।। असं म्हणत जगाला समता शांतीचा आणि विवेकाचा संदेश देणारे महान व्यक्तिमत्त्व म्हणजे संत तुकाराम. संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठास गेले अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे. त्याच आख्यायिकेस अनुसरून तुकाराम बीज सोहळा साजरा केला जातो. मोडनिंब (ता.माढा) येथे संत तुकाराम महाराज बीज सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

३७६ व्या सदेह वैकुंठगमन त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सव सोहळ्यानिमित्त यमाई मंदिर आणि गाभाऱ्याला आकर्षक सजावट करण्यात आली.गुरुवारी सकाळी अकरा वाजता विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. या सोहळ्याची सुरुवात युवा कीर्तनकार हभप निरंजन महाराज सुर्वे यांच्या प्रवचनाने झाली. कटू अनुभवांचे हलाहल पचवून जगाला सद्विचारांचे अमृत उपलब्ध करुन देणारे तुकोबा महान संत असल्याचे प्रवचनात सांगितले.त्यांनी संत तुकाराम गाथेचे वाचन करून भाविकांना प्रत्येक ओळींचा अर्थ सांगितला.यावेळी नामस्मरण, कीर्तन, प्रवचन, भजन आणि गाथा पारायणाचे आयोजन करण्यात आले. तुकाराम बीज हा संत तुकारामांचा वैकुंठ गमन दिवस मानला जातो.

फाल्गुन वद्य द्वितीयेला तुकारामांचे सदेह वैकुंठ-गमन झाले, असे मानले जाते. हा दिवस 'तुकाराम बीज' म्हणून ओळखला जातो.प्रवचन सोहळ्यानंतर दुपारी बारा वाजता पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर महाआरती झाली.तुकारामांच्या नामाचा आणि विठ्ठलाच्या नामाचा गजर करण्यात आला.या बीज सोहळ्यास सारंग सुरवसे, हरी पाटील, बंडू पाटील, राजू महामुनी,महेश पाटणे, बंटी पवार,जयसिंग पाटील,गणेश पाटील यांच्यासह जय भवानी चौक मित्र मंडळ व छत्रपती शिवाजी महाराज चौक मित्र मंडळ यांनी संयुक्त परिश्रम घेतले.



## अज्ञात कारणाने तरुणीची आत्महत्या

**दक्षिण सोलापूर :** शुक्रवारी सकाळी बसवनगरमधील एका तरूणीने गळफास आत्महत्या केल्याची घटना घडली. पल्लवी किसन पवार वय १९ राहणार बसवनगर असे आत्म हत्या केलेल्या तरूणीचे नाव आहे. बसवनगर येथे पल्लवी पवार हिने शुक्रवारी सकाळी अज्ञात कारणावरून राहत्या घरातील लोखंडी पाईपला साडीने गळफास लावून घेवुन आत्महत्या केल्याची फिर्याद किसन पवार वय ४२ राहणार बसवनगर यांनी दिली आहे. तपास सहायक फौजदार शिंदे करीत आहेत.

## बार्शीतील श्री भगवंत मंदिरात तुकाराम बीज भक्तिभावाने साजरी

### श्री भगवंत वारकरी शिक्षण संस्थेची २८ वर्षांची अखंड परंपरा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.६ मार्च-**
जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज यांची तुकाराम बीज बार्शी येथील श्री भगवंत मंदिरात अत्यंत भक्तिभावाने साजरी करण्यात आली. श्री भगवंत वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने गेल्या २८ वर्षांपासून ही परंपरा जोपासली जात आहे.





यावेळी दुपारी १२ वाजता श्री तुकाराम महाराज यांच्या मूर्तीवर फुलांची व गुलालाची उधळण करुन अभंग गायनाच्या गजरात गुलाल कीर्तन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसाद म्हणून खीर वाटप करण्यात आली. तुकाराम बीजनिमित्त मंदिरात २६ फेब्रुवारीपासून नामसप्ताहाचे आयोजन केले होते. पारायण, गाथा भजन, हरिपाठ व हरिकीर्तन यांचे आयोजन करण्यात आले होते. दररोज एक हजार ते दीड हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. बीजेनिमित्तच्या सप्ताहाची सांगता शुक्रवार दि. ६ मार्च रोजी काल्याच्या कीर्तनाने झाली. श्री भगवंत वारकरी शिक्षण संस्थेचे प्रभाकर बारबोले, भारत बारबोले, बाबा काळे, नंदू सुर्डीकर, बिरु महाराज आणि चांगदेव लांडगे यांचा पुढाकार होता.

## बार्शी-कुर्डुवाडी रोडवर अपघात; दुचाकीला कारची धडक, महिला जखमी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.६ मार्च-**
बार्शी-कुर्डुवाडी रोडवरील श्रीपतपिंपरी फाटा येथे कारने दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात एका महिलेचा गंभीर जखमी झाल्याची घटना १ मार्च रोजी सायंकाळी घडली. याप्रकरणी कार चालकाविरोधात बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दत्ता बबुवाहन गायकवाड (वय ४१, रा. मुळ अलिपूर रोड, बार्शी, सध्या रा. सात रस्ता सोलापूर) हे आपल्या आई राजामती बब्रुवाहन गायकवाड (वय ५७) यांच्यासोबत दुचाकी (क्र. एमएच १३ बीए ६१२१) वरुन रिधोरे, ता. माढा येथून बार्शीकडे येत




होते. सायंकाळच्या सुमारास बार्शी-कुर्डुवाडी रोडवरील श्रीपतपिंपरी फाटा येथे असलेल्या स्पीड ब्रेकरवर दुचाकीची गती कमी करत असताना कुर्डुवाडीच्या दिशेने येणाऱ्या इर्टिगा कारने (क्र. एमएच १३ ईपी ३३२८) त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली.

या अपघातात दोघेही रस्त्यावर पडले. अपघातात राजामती गायकवाड यांच्या नाकातून रक्तस्राव होऊन दात पडले तसेच हात व पायाला दुखापत झाली. घटनास्थळी जमलेल्या नागरिकांनी जखमींना मदत करुन त्यांना उपचारासाठी बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये दाखल केले. दत्ता गायकवाड यांनी कार चालकाचे नाव आकाश चंदू कचरे (रा. करमाळा बायपास चौक, टेभुर्णी, ता. माढा असे असल्याचे सांगितले. अपघातानंतर जखमींना रुग्णालयात आणण्यात आले; मात्र उपचार सुरु असताना संबंधित कार चालक तेथून निघून गेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या अपघातात दुचाकी व कारचे अंदाजे सुमारे ५ हजार रुपयांचे नुकसान झाले असून कार चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वेगात वाहन चालवल्यामुळे हा अपघात झाल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या संदर्भात बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.



## पंढरपुरात तुकाराम महाराज बीज उत्सव उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ मार्च-**
संतश्रेष्ठ जगद्गुरु श्री तुकाराम महाराज यांच्या बीज दिनानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी पहाटेपासूनच मंदिर परिसरात हरिनामाचा गजर, अभंग गीते व भजन-कीर्तनाने वातावरण भक्तिमय झाले होते. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेस दर्शन घेतले तसेच संत तुकाराम महाराजांच्या चरणी कृतज्ञतापूर्वक वंदन केले. मंदिरात विशेष पूजा व आरती करण्यात आली.

संत तुकाराम महाराजांनी दिलेल्या हरिनामाच्या संदेशाचे स्मरण करून भाविकांनी गाथा, अभंग व हरिनाम संकीर्तनाद्वारे भक्तिभाव व्यक्त केला.